MHAH080003272024

## नियमित दिवाणी दावा क्र.१७०/२०२४

## निशाणी क्र.५ वरील आदेश

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी यांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे असे कथन आहे की, सदरहु दावा प्रतिवादींविरूध्द जाहीर ठराव होवुन मिळणेकरीता व निरंतर ताकिद मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे.दावा मिळकत ही वादीच्या मालकीची आहे. दावा कलम १अ वादीचे मालकीचे व दावा मिळकत १ब ही प्रतिवादी यांच्या मालकीची आहे. प्रतिवादी नं.१ ते ३ त्यांच्या मिळकतीच्या पुर्वेकडील मिळकतीतुन रस्त्याचा वापर करत आहेत. परंतु प्रतिवादी यांनी रस्ता केस के. ९६/२०२१नुसार सर्वे नं.६२/९ व सर्वे नं. १/३ या मिळकतीतुन रस्त्याची मागणी केली आहे त्या केस मध्ये वादीचे अपरोक्ष तहसीलदार यांनी प्रतिवादीच्या बाजुने निकाल दिलेला आहे. त्याचे अधारे दि. २३/०२/२०२४ रोजी रस्ता खुला करण्याची नोटीस वादीला दिलेली आहे. त्या नुसार नोटीस नुसार रस्ता झालेस दाव्याचा हेतु नष्ट होणार आहे. त्यामुळे वादी यांनी सदर अर्जातुन निरंतर मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

**०३.** प्रतिवादींना सदर दाव्याचे समन्स व नोटीसची बजावणी होवुन प्रतिवादी यांनी त्यांचे लेखी कैफियत व म्हणणे निशाणी क्र.१३ वर दाखल करुन दावा व मनाई हुकुमाचा अर्ज खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर असुन दाव्यातील व मनाई अर्जातील मजकुर अमान्य केला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रतिवादीचा गट नं. ६२/१० असुन वादीचा गट नं.६२/९ व १/३ आहे. प्रतिवादीच्या दक्षिणेस अकोले

मंगळापुर असा मळयातील रस्ता आहे. गट नं. ६२/१० साठी स्वतंत्र रस्ता नाही. पुर्वी पासुन वादी नं. १ यांच्या जमीनीतुन वाहतुक सुरू आहे. दि. २१/११/२०२१ पासुन वादींनी त्या रस्ताने वाहतुक करणेस हरकत घेतली त्यामुळे तहसीलदार यांनी दि. २३/०८/२०२२ रोजीच्या स्थळ निरिक्षण पंचनाम्यामधून रस्ता असल्याचे दर्शवले. त्यानुसार रस्ता के. सनं. ९६/२०२१ मध्ये त्यांनी प्रतिवादीचे बाजुने निकाल दिला. रस्त्याच्या अभावी ३ वर्षा पासुन प्रतिवादीची जमीन पडीत आहे. त्यामुळे त्यांनी वादीचा अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

**०४.** वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथन व अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा यावरुन खालील निर्धारण बिंदु उपस्थित झाले आहेत व त्याखाली विवेचनाच्या आधारे निष्कर्ष नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **निर्धारण बिंदु** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने हे सिध्द केले आहे काय की, त्याचा दावा प्रथमदर्शनी संयुक्तीक आहे ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा तराजु वादीचे बाजूने आहे का ? | नकारार्थी |
| ३. | तात्पुरता मनाई हुकूम दिला नाही तर वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे का? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## :: कारणमिमांसा ::

**०५.** प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत अर्जाचे कामी निशाणी क्र. ०३,१९,२६ सोबत कागदपत्रे दाखल केले आहेत. प्रतिवादीचे म्हणण्याचे अवलोकन केले. प्रतिवादीनी त्यांचे कथनाचे पुष्ठयर्थ कागदपत्रे दाखल केले नाहीत. वादी व प्रतिवादी यांचे विव्दान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

## <u>निर्धारण बिंदु क्रमांक १ ते ३ करीता</u> :-

**०६.** निर्धारण बिंदू क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत विचाराधीन घेतले आहेत.

**०७.** यातील वादी यांनी त्यांचे मुळ दाव्यात व मनाई अर्जामध्ये कथन केलेनुसार दावा मिळकत १अ वादी यांचे मालकीची असुन दावा मिळकत १ब प्रतिवादीच्या मालकीची आहे. त्याचे शबीती करिता वादीने यादी नि.३/१ ते ३ कडे मिळकतीचे उतारे हजर केले आहेत. वादी व प्रतिवादी यांच्या दावामिळकतीवरील मालकी बाबत व वहीवाटी बाबत संबंधीत पक्षकारांनी वाद उपस्थीत केल्याचे दिसुन येत नाहीत. वादीचे कथनानुसार प्रतिवादी दावा मिळकत १ अ मधुन रस्ता करू पाहत आहेत. त्या करिता त्यांनी तहसीलदार यांनी रस्त केस नं.९६/२०२१ मध्ये दिलेल्या निकालाचा आधार घेतलेला आहे. वादीचे कथनानुसार तहसीलदार यांनी दिलेला निकाल बेकायदेशिर आहे. वादी यांनी यादी नि.३/५ कडे रस्ता केस नंबर ९६/२०२१ मधील निकालाची प्रत, यादी नि. १९ कडे रस्ता केस नं. ९६/२०२१ मधील स्थळ निरिक्षण पंचनामा व स्थळ दर्शक नकाशाची प्रत हजर केली आहे.

**०८.** सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता रस्ता केस नं.९६/२०२१ मधील निकाल प्रतिवादी नं.१ ते ३ यांच्या बाजुने झालेला दिसतो. प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत आणि म्हणणे मध्ये नमुद केले नुसार स्थळ निरीक्षण , पंचनामा वेळी वादी नं.१ व २ यांनी रस्ता बंद केल्याचे दिसुन आले होते. त्याच्या आधारे तहसीलदार यांनी रस्ता केस नंबर ९६/२०२१ मध्ये निकाल दिला. रस्ता केस नंबर ९६/२०२१ मधील निकालाचे अवलोकन केले असता त्यामध्ये नमुद केले आहे की, प्रतिवादी यांची जमीन पडीत आहे व वादी यांचे जमीनीत पीक आहे. प्रतिवादी यांच्या मिळकतीत जाण्यासाठी रस्ता नाही. वादी यांच्या मिळकती मधील दक्षिण बाजुने रस्ता आहे त्याशिवाय दुसरा

पर्यांयी रस्ता नाही. प्रतिवादी यांनी पर्यायी रस्ता असल्याचे दर्शवणे करिता वादी यांनी त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केल्याचे देखिल दिसुन येत नाही. या उलट स्थळ निरीक्षण पंचनामा , नकाशा आणि तहसीलदार यांचा निकाल याचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादी यांच्या जमीनीच्या बांधा वरून वहीवाटीसाठी अडथळा निर्माण केल्याचे दिसत आहे. यावरून वादी यांच्या मिळकतीच्या बांधावरून पुर्वीपासुन रस्ता होता असे दिसुन येते.

**०९.** अभिलेखावरील उपलब्ध कागदोपत्री पुरावा यावरून असे लक्षात येते की, गट नं.६२/९ आणि गट नं. १/३ चे बांधावरून प्रतिवादी नं.१ ते ३ यांना जाण्यासाठी रस्ता होता. तो रस्ता वादी यांनी बंद करून अडथळा निर्माण केला.वादीचे कथनानुसार प्रतिवादीला जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. परंतु वर नमुद केले नुसार वादी यांनी रस्ता केस नं. ९६/२०२१ मध्ये म्हणणे दिले नाही व पर्यायी रस्त्या बाबतचा पुरावा दिलेला नाही. अशा परिस्थीतीत प्रतिवादी नं.१ ते ३ यांना कोणता पर्यायी रस्ता उपलब्ध आहे याचे स्पष्टीकरण वादी ने दिले नाही. तसेच रस्ता केस नं.९६/२०२१ च्या निकाला विरोधात वादी ने कोणती दाद मागितली किंवा कसे याबाबत देखील नमुद केले नाही. अशा परिस्थितीत पर्यायी रस्त्यासंबंधीची कागदपत्रे व पुरावे पटलावर येणे गरजेचे आहे. तो पर्यंत जर वादीचा अर्ज मंजुर केला तर संबंधीत अधिकारी यांच्या आदेशाचे पालन न झाल्यास वादातीत रस्ता पुर्णपणे नष्ट होण्याची शक्यता आहे. सदर रस्त्याबदददल अद्याप पर्यंत योग्य ते पुरावे पटलावर आलेले नाहीत. त्यामुळे वादातीत मिळकतीच्या रस्त्याबददल दाव्याच्या या स्टेजला निर्णय घेणे उचीत ठरणार नाही. अशा परिस्थितीत वादीचा अर्ज मंजुर करणे योग्य ठरणार नाही.

**१०.** सद्यस्थितीला दोन्ही बाजुंच्या कथनांची पुराव्यातील ग्राहयता ही बाब संपरिक्षेमध्ये ठरवली जाईल. त्यामुळे त्याचा विचार प्रस्तुत अर्जाचे कामी करता येणार नाही. सबब वादी ने प्रतिवादी नं.१ ते ३ यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याचे प्रथमदर्शनी शाबीत केलेला आहे, हे उपरोक्त नमुद कारणमिमांसेवरून स्पष्ट नाही. त्यामुळे न्यायाचा तराजु/समतोल हा प्रतिवादीच्या बाजुने असल्याचे स्पष्ट होते. सबब,

प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होईल ही बाब स्पष्ट होते. **करीता मी निर्धारण बिंदु क्र.१ ते ३ चा निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदवित आहे**.

**निर्धारण बिंदु क्र.४ करीता** :-

**११.** निर्धारण बिंदु क्रमांक १ ते ३ चे निष्कर्षावरून वादीचा अंतरिम अर्ज हा अंशतः मंजुर होण्यास पात्र असल्याचे स्पष्ट होते. **करीता निर्धारण बिंदु क्रमांक ४ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे**.

**:: आ दे श ::**

**१)** वादीचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही/-
(स्वप्नाली एम. वाघमारे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

दिनांक : २०.०५.२०२४.